पी. आर. पोटे पाटील एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट,
अमरावती संचालित

# पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती


**(डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला, संलग्नित)**

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

## २०२२-२०२३

# जागतिक दुध दिन - १ जुन 2022









# देशोन्नती

## पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात 'जागतिक दूध दिवस' साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अमरावती** ■ दूध हा परिपूर्ण आहार असून मनुष्य आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थाचे अनन्यसाधारण महत्व आहे. दूध सेवनाने शारीरिक व बौद्धिक क्षमतेत वाढ होते. या सर्व बाबींचा विचार करून संपूर्ण जगात १ जून हा जागतिक दूध दिवस म्हणून साजरा करण्यास येतो. त्या अनुषंगाने पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व ग्रामीण कृषी जागृतता कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांनी जागतिक दूध दिवस साजरा केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी विद्या विभागाच्या प्राध्यापिका श्वेता गणवीर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक से. नि. पशुधन विकास अधिकारी डॉ. शरद देशमुख यांनी आहारातील दुधाचे महत्त्व विशद करताना पावसाळ्यातील जनावरांची निगा व लसीकरणाबाबत सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकाचे निरसन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील प्रा. उदय देशमुख यांनी मानवी आहारातील दुधाचे महत्त्व, दुधातील विविध घटक भेसळ याबाबत माहिती देतानाच १ जू या जागतिक दूध दिनाची थीम 'डेअ नेट झिरो' असल्याचे सांगताना वातावरणातील बदलांच परिणामांबाबत माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सातव्य सत्रातील विद्यार्थिनी कु. भाविका राऊ हिने केले. आभार प्रदर्शन कु. साक्ष अर्डक हिने केले. राष्ट्रगीता कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

Amravati Edition
Jun 5, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com




मनुष्य आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता दूध हा परिपूर्ण आहार म्हणून १ जून 'जागतिक दूध दिवस' म्हणून संपूर्ण विश्वात साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने पी. आर. पोटे पाटील कृषि, महाविद्यालयात पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागामार्फत हा दिवस साजरा करण्यात आला. मुख्य मार्गदर्शक डॉ. एस. एन. देशमुख (से. नि. पशुधन विकास अधिकारी, अमरावती) यांनी मानवी आहारातील दुधाचे महत्व या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी नितेश चौधरी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्रद्धा देशमुख यांनी कार्यक्रम आयोजनासाठी प्रयत्न घेतले.

# जागतिक पर्यावरण दिवस- ०५ जून 2022








## पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण सप्ताहास सुरुवात

अमरावती (प्रतिनिधी) : पी. आर. टे पाटील कृषी महाविद्यालय, मरावती येथे जागतिक पर्यावरण ाहाची सुरुवात महाविद्यालय सरात वृक्ष लागवड करून करण्यात ली.

सदर सप्ताहानिमित्त सार्वजनिक ळाची स्वच्छता, वृक्षारोपण असे विध उपक्रम सप्ताहानिमित्त बवण्यात येणार आहेत. हाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य नितेश धरी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे हत्त्व समजावून सांगितले. 'तसेच एक मनुष्य एक झाड' या संकल्पनेचा वापर करून प्रत्येकाने एक झाड लावून आपले आद्य कर्तव्य पार पाडावे असे सांगितले. सदर कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना सहायक कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक श्रद्धा देशमुख, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे यांनी आयोजनाबाबत समाधान व्यक्त करून कौतुक केले.

UNEP United Nations Environment Programme ने ५ जून हा दिवस जागतिक 'पर्यावरण दिन' म्हणून साजरा करण्यात यावा असे निर्देश दिले आहे. पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा करण्यात आला. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून. पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताहाचे देखील महाविद्यालयामार्फत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध सार्वजनिक स्थळी जाऊन स्वच्छता मोहीम राबवली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. नितेश चौधरी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# जागतिक योग दिवस- २१ जून 2022





अमरावती मंडल | अमरावती

## पी.आर.पोटे शैक्षणिक समूह में मनाया विश्व योग दिवस

**राष्ट्रीय सेवा योजना पथक का आयोजन**

प्रतिनिधि/दि.21

अमरावती-स्थानीय पी.आर. पोटे पाटिल अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय यहां 8वां अंतर्राष्ट्रीय योग दिवस कार्यक्रम का आयोजन राष्ट्रीय सेवा योजना पथक व्दारा सुबह 8 बजे महापारायण सभागृह में किया गया था. इस अवसर पर योग शिक्षक पराग दफ्तर ने मार्गदर्शन किया तथा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारियों को योगा का प्रशिक्षण दिया. कार्यक्रम में अन्य संस्थाओं व विद्यालयों ने भी सहभाग लिया.

जिसमें पी.आर.पोटे पाटिल आयुर्वेद महाविद्यालय व अस्पताल, पी.आर.पोटे फार्मसी महाविद्यालय, पी.आर.पोटे पाटिल कृषि महाविद्यालय पी.आर.पोटे पाटिल इंटरनेशनल स्कूल, आर्किटेक्चर महा विद्यालय डी.एड. महा विद्यालय का समावेश रहा.

कार्यक्रम की शुरुआत दीप प्रज्वल व धन्वंतरी पूजन से की गई कार्यक्रम का ... संचालक डॉ. दिलीप चरहाटे ने किया तथा प्रास्ताविक डॉ. सोनाली इंगले ने रखा व आभार प्रा. श्रीधर मेंढे ने माना. कार्यक्रम में संस्था उपाध्यक्ष श्रेयस पोटे, अभियांत्रिकी महाविद्यालय के प्राचार्य डॉ. डी.टी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. झुहेर व सभी महाविद्यालय के प्राचार्य, डॉ. श्याम भुतडा, डॉ. झंवर, प्रा. चौधरी, प्रा. देशमुख, प्रा. दुर्गे, अभियांत्रिकी विभाग प्रमुख कुलट, डॉ. कावलकर, किशोर देशमुख, प्रा. अमित घाडगे, प्रा. सोलव, प्रा. प्रसाद देशमुख, राजीव राजस व सभी प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित थे. कार्यक्रम को सफल बनाने प्रा. गौरी देशपांडे, प्रा. ठाकरे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीधर मेंढे ने अथक प्रयास किए.



पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे २१ जून रोजी "आंतरराष्ट्रीय योग दिवस" साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी पी. आर पोटे पाटील आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भुतडा यांनी योगाचा मनुष्याच्या आरोग्यावर, सकारात्मक मानसिकतेवर तसेच कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामाबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर होते. कार्यक्रमाचे आयोजन पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संकुलामार्फत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पोटे कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. नितेश चौधरी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्रद्धा देशमुख तसेच सर्व प्राध्यापक विद्यार्थी कर्मचारी मोठ्या संख्येने आभासी पद्धतीने उपस्थित होते.

# शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम – २१ जून २०२२








सकाळ

## वडगाव माहोरे येथील शेतकऱ्यांना शेतीबाबत प्रशिक्षण

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. २८ : पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथील कृषी अभ्यासक्रमांतर्गत ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत वडगाव माहोरे येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रा. उदय देशमुख व विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी सरपंच माला माहोरे होत्या. प्रमुख मार्गदर्शक पशुधन विकास अधिकारी डॉ. स्वप्नील महाळंकर, मदर डेअरी अमरावती समन्वयक प्रदीप गंधे, प्रा. राहुल कळसकर, उपप्राचार्य प्रा. नीतेश चौधरी यांच्यासह विद्यार्थिनी रुचिता पांडे, भाविका राऊत, वैष्णवी पाथरे, किरण नाईक यांनी शेतकऱ्यांना शेतीसंबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी प्रा. श्रद्धा देशमुख, प्रा. हेमंत पवार, प्रा. श्वेता गणवीर, डॉ. अर्चना बेलसरे, प्रा. श्वेता देशमुख, डॉ. अर्चना त्रिपाठी उपस्थित होत्या. यावेळी ॲग्रोवनचे सचिन शेगोकार व हुकूमचंद माने यांनी सकाळ ॲग्रोवनबाबत माहिती देतानाच समृद्ध खरीप बक्षीस योजनेबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रगतशील शेतकरी सचिन माहोरे, नीलेश माहोरे, निर्मला माहोरे, सौरभ माहोरे तसेच विद्यार्थी भाग्यश्री इंगळे, तुबा फिरदोस, शुभम राजनकर, समीर बेंडे यांनी मदत केली. प्रशिक्षणाला गोवर्धन गावंडे व बोरगाव धर्माळे येथील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. उदय देशमुख यांनी, तर संचालन रुचिता पांडे व भाविका राऊत यांनी केले. आभार वैष्णवी पाथरे हिने मानले.

अमरावती : ॲग्रोवनच्या प्रवेशिकांसह शिक्षक व विद्यार्थी.

Nagpur, Amravati-Today
29/06/2022 Page No. 3

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती मार्फत वडगाव माहुरे येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच माला माहोरे होत्या. प्रमुख मार्गदर्शक पशुधन विकास अधिकारी डॉ. स्वप्नील महाळकर, मदर डेरी अमरावती यांनी शेतकऱ्यांना शेती संबंधित विविध विषयावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पी. आर.  पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते.

## छत्रपती शाहू महाराज जयंती - २६ जून 2022








पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे छत्रपती शाहू महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर यांनी शाहू महाराजांच्या जिवणकर्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा. नीतेश चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक प्रा. श्रद्धा देशमुख, सर्व शिक्षक - शिक्षकत्तर कर्माचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# सेंद्रीय शेती शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम -२७ जून २०२२







पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयामार्फत ग्राम वाठोंडा, तालुका चांदूरबाजार, जिल्हा अमरावती येथे १ दिवशीय सेंद्रिय शेती काळाची गरज शेतकरी प्रशिक्षण वी घेण्यात आला. महाविद्यालयाच्या कृषीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका श्वेता गणवीर यांनी विविध सेंद्रिय पदार्थांबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाचे कृषी शास्त्र विभागाचे प्राध्यापक श्री. हेमंत पवार यांनी सेंद्रिय शेती बद्दल सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाकरिता महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

# कृषि दिन- कृषि संजीवनी सप्ताह- ०१ - ०७ जुलै २०२२



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयात ‘कृषि संजीवनी सप्ताह’ साजरा करण्यात आला. महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन देखील करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर यांनी देखील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या बद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक, आभारप्रदर्शन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले. सदर कार्यक्रम आयोजनासाठी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक प्रा. नितेश चौधरी व श्रद्धा देशमुख यांनी कार्यक्रम आयोजनाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी पालक व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकमान्य बालगंगाधर टिळक जयंती :- २३ जुलै २०२२





पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक २३ जुलै २०२२ रोजी लोकमान्य बाल गंगाधर टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. अथक परिश्रम घेतले.

## अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा मोहीम १२ ऑगस्ट २०२२



देशोन्नती

### पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयात अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा मोहिमेचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अमरावती** ■ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशभरात उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे केंद्र व राज्य शासनामार्फत आयोजन करण्यात आले आहे. तसेच १२ ऑगस्ट २०२२ रोजी राज्यभरात अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या सर्व विभागांनी आपल्या स्तरावर अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घ्यावी असे आवाहन करण्यात आले होते.

तरुणाई ही कोणत्याही राष्ट्राची ऊर्जा असते आणि तरुणांच्या शक्तीचे समाज आणि देशाच्या विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यामुळे जास्तीत जास्त तरुणांनी नशामुक्त भारत अभियानात सहभागी होणे अत्यंत गरजेचे आहे. देशासमोरील हे आव्हान स्वीकारून आज आपण नशामुक्त भारत अभिनांतर्गत एकजूट होऊ आणि केवळ समाज, कुटुंब, मित्रच नव्हे तर आपण स्वतःही नशामुक्त होऊया कारण बदलाची सुरूवात स्वतःपासूनच झाली पाहिजे अशी शपथ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामुहिकरीत्या घेतली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.वैभव लाजुरकर, उपप्राचार्य नितेश चौधरी, प्रा.जाधव, प्रा.श्रद्धा देशमुख तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

Deshonnati Edition
Aug 19, 2022 Page No. 2





पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. नशा मुक्त भारत अभियाना अंतर्गत एकजूट होऊन केवळ समाज, कुटुंब, मित्र नव्हे तर आपण स्वतःही नशा मुक्त होऊ या बदलाची सुरुवात स्वतःपासून

झाली पाहिजे अशी शपथ पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सामूहिक रित्या घेतली.

## डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती -१२ ऑगस्ट २०२२



**पोटे पाटील कृषि कॉलेज में मनाई डॉ.रंगनाथन की जयंती**



अमरावती-स्थानीय पी.आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय के ग्रंथालय विभाग द्वारा १२ अगस्त को ग्रंथालय शास्त्र के जनक पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन की १३० वीं जयंती मनाई गई. इस समय कार्यक्रम के अध्यक्ष व कॉलेज के प्राचार्य डॉ. वैभव लाजूरकर के हाथों दीप प्रज्वलन व डॉ. रंगनाथन की प्रतिमा का पूजन किया गया. इस अवसर पर मुख्य अतिथि के रूप में उपस्थित उपप्राचार्य नितेश चौधरी व महाविद्यालय के सभी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित थे.

पी

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती द्वारा १२ ऑगस्ट रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची १३० वी जयंती उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव राजुरकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमा करिता महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वातंत्र दिवस व वृक्षारोपण कार्यक्रम :-१५ ऑगस्ट २०२२








पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे स्वातंत्र्य दिन साजरा. सदर कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रवीणभाऊ पोटे पाटील यांनी ध्वजारोहण केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रेयसदादा पोटे पाटील, संस्थेचे संचालक डॉ. डि. टि. इंगोले, महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांच्यातर्फे

महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## गाजर गवतनिर्मुलन सप्ताह :- १६ ते २२ ऑगस्ट २०२२






गाजरगवताविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने गाजर गवत जागरूकता कार्यक्रम डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या आदेशान्वये पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे दिनांक १६ ते २२ ऑगस्ट २०२२ यादरम्यान गाजर गवत निर्मूलन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.


## शिक्षक दिन:- ०५ सप्टेंबर २०२२




शिक्षक दिन हा सर्व शिक्षकांना समर्पित असा विशेष दिवस आहे जो शिक्षकांना सन्मानित करण्यासाठी दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येतो. पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय

अमरावती येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर यांनी शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. महाविद्यालयातील उपप्राचार्य श्री. नितेश चौधरी यांनी आपल्या आयुष्यात आपल्या शिक्षकांची आवश्यकता आणि मूल्य समजून घेणे आवश्यक आहे हे पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रद्धा देशमुख व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी :-२५ ऑक्टोबर २०२२




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती आदरांजली अर्पण करण्यात आली.

## पंडित जवाहरलाल नेहरू जयंती -१४ नोव्हेंबर २०२२





पी.आर. पोटेपाटील कॉलेज में नेहरुजी की जयंती मनाई

अमरावती- पी.आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय में देश के पहले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु की जयंती उत्सव मनाया गया. कार्यक्रम में अध्यक्ष के रुप में महाविद्यालय के प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर उपस्थित थे. कार्यक्रम का आयोजन रासेयो स्वयंसेवक, महाविद्यालय के उपप्राचार्य तथा कार्यक्रम अधिकारी नितेश चौधरी व सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रद्धा देशमुख उपस्थित थे.



पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू जयंती उत्सव साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजूरकर तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री नितेश चौधरी, महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## भगवान बिरसा मुंडा जयंती १५ नोव्हेंबर २०२२






पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे भगवान बिरसा मुंडा जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वैभव लाजुरकर यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती मिसळे, प्रास्तविक ओम मोहोड व आभार प्रदर्शन इशश्री चौरागडे यांनी केले.

## संविधान दिवस:- २६ नोव्हेंबर २०२२








भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर राज्यकारभार सुरळीत चालावा तसेच घटनात्मक दर्जा प्राप्त व्हावा यासाठी भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अस्तित्वात आली. सदर घटना ही घटना समितीने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार केली त्या अनुषंगाने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान म्हणून साजरा करण्यात येत आहे. डॉ. वैभव लाजुरकर यांनी संविधानाचे महत्व विशद करतानाच घटनेतील विविध कलमातील तरतुदी विशद केल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, यांनी सामूहिक रित्या संविधानाचे वाचन करून संविधान दिवस साजरा केला.


## शिक्षारंभ कार्यक्रम :- २८ नोव्हेंबर २०२२




डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला, संलग्नित पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालययात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या ओरिएंटेशन कार्यक्रम नासिक पद्धतीने घेण्यात आला. त्याच बरोबर पालक सभेचे देखील आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिका तसेच इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महापरिनिर्वाण दिन:- ६ डिसेंबर २०२२



पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर यांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला व त्यांचे समजकार्य विद्यार्थ्यांना सांगीतले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

## ❖ संत गाडगेबाबा पुण्यतिथी :-२० डिसेंबर २०२२



वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांना हरार्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## डॉ. पंजाबराव देशमुख जयंती :- २७ डिसेंबर २०२१



पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितेश चौधरी, सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रद्धा देशमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांच्या सहकार्याने संपन्न झाला.

## सावित्रीबाई फुले जयंती :- ०३ जानेवारी २०२३







भारतातील पहिल्या महिला शिक्षीका सावित्रीबाई फुले यांची जयंती पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे ३ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली. या दिवसाला अनुसरून विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांचे आपल्या जीवनातील महत्त्व व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. सावित्रीबाई फुले यांनी आपल्या जीवनात विविध हाल-अपेष्टा, कष्ट सहन करूनही स्त्रियांना शिकवण्याचे महत्वाचे कार्य हाती घेतले होते अशे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक व सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर :-६ ते १२ जानेवारी २०२३










डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला व्दारा संलग्नित

पी.आर.पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना पथकव्दारा आयोजित विशेष शिबिर - २०२२-२३

स्थळ :- नांदूरा, ता.जि.अमरावती

दि. ०७ ते १२ जानेवारी २०२३

## ❊ निमंत्रण पत्रिका ❊

श्री/श्रीमती/सौ. ..............................

आमच्या महाविद्यालयाचे सन २०२२-२३ या सत्रातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष शिबिर दिनांक ७ जानेवारी ते १२ जानेवारी २०२३ यादरम्यान ग्राम नांदुरा ता. जि. अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरातील विविध कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### आपले विनीत

डॉ. वैभव. जी. लाजूरकर (प्राचार्य) — प्रा. नितेश बी. चौधरी (उपप्राचार्य)

प्रा. श्रद्धा एस. देशमुख (कार्यक्रम अधिकारी) — प्रा. राहुल आर. कळसकर (रा.से.यो.शिबिर समन्वयक)

प्रा. श्वेता एन. देशमुख (रा.से.यो.शिबिर समन्वयक) — डॉ. अर्चना ओ. त्रिपाठी (रा.से.यो.शिबिर समन्वयक)

प्रा. हेमंत व्ही. पवार (रा.से.यो.शिबिर समन्वयक) — प्रा. मदन यु. जाधव (रा.से.यो.शिबिर समन्वयक)

सौ. सूर्यकांता बावणे (सरपंच) — श्री. मोहन देशमुख (उपसरपंच)

आयशा नबी (पोलीस पाटील) — सौ. नम्रता जाधव (तलाठी)

सौ. वैशाली नादने (ग्रामसेवक) — श्री. विनय देशमुख (मुख्याध्यापक जि.प.प्रा.शाळा)

श्री. शरद राऊत (तंटामुक्ती अध्यक्ष) — श्री. बाबासाहेब किरदटे (अध्यक्ष से.स.सोसायटी)

श्री. रमेशराव कवाने (उपाध्यक्ष से.स.सोसायटी) — श्री. नरेंद्र डोंगरे

श्री. ओम प्रकाश अग्रवाल — श्री. नितीन किरदटे — श्री. रफिक सौदागर

प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व सन्माननीय ग्रामस्थ

"उन्नत भारत - उन्नत महाराष्ट्र - उन्नत ग्राम अभियान"

### दैनंदिन सत्र

| दिनांक | कार्यक्रम रूपरेषा |
| --- | --- |
| ६ जानेवारी | आगमन, पूर्वतयारी, नाव नोंदणी, ग्रामस्थांशी चर्चा व नियोजन |
| ७ जानेवारी | उद्घाटन समारंभ : उद्घाटक - श्री दादा पोटे पाटील (अध्यक्ष,पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संकुल अमरावती) अध्यक्ष डॉ. वैभव लाजुरकर (प्राचार्य पी. आर. पोटे पाटील कृषि महा. अमरावती) |
| ८ जानेवारी | मूल्यशिक्षण व व्यक्तिमत्व विकास - सौ. सीमा दिघाडे (सहा. प्राध्या. इंग्रजी) |
| ९ जानेवारी | आरोग्य तपासणी शिबिर : उद्घाटक - डॉ. संदीप हाडोळे (संचालक विद्यार्थी कल्याण, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला) |
| १० जानेवारी | युवकांमधील शैक्षणिक व सामाजिक आव्हाने - श्री सुबोध दांडगे (असि. कमांडंट पोलीस) |
| ११ जानेवारी | कृषक चर्चा - प्रा. प्रमोद अवघड (कृषि अर्थशास्त्र विभाग, विभागीय सोयाबीन संशोधन केंद्र, अमरावती) |
| १२ जानेवारी | समारोप : अध्यक्ष - डॉ. वैभव लाजुरकर (प्राचार्य कृषी महाविद्यालय,अमरावती) प्रमुख अतिथी - प्रा. राजेश खाडे (प्राचार्य, जनता कृषी तंत्र विद्यालय, अमरावती) |

### शिबिरातील प्रकल्प

- आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत युवकांचा ध्यास शहर-ग्राम विकास
- ग्रामविकास नियोजन
- कृषि मार्गदर्शन
- घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा
- हागणदारी मुक्त अभियान
- स्वच्छ भारत अभियान

### रा.से.यो.शिबिरातील दैनंदिनी

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| प्रार्थना व योगासने | सकाळी ६ ते ७.३० | बौद्धिक सत्र | दु. ३ ते ५.३० |
| चहा व अल्पोहार | सकाळी ८ ते ९ | मावकऱ्याशी भटचर्चा | सायं. ५.३० ते ६.३० |
| श्रमदान | सकाळी ९ ते १२ | प्रार्थना व स्फूर्ती गीते | सायं. ६.३० ते ७ |
| वैयक्तिक स्वच्छता व भोजन | दु. १२ ते २ | भोजन | सायं. ७ ते ८ |
| विश्रांती | दु. २ ते ३ | सांस्कृतिक कार्यक्रम | सायं. ८ ते १० |

### शिबिरा दरम्यान राबविण्याचे उपक्रम

❊ परिसर स्वच्छता ❊ व्यक्तिमत्व विकास ❊ व्यसनमुक्ती ❊ आरोग्य तपासणी ❊ अंधश्रद्धा निर्मूलन व जनजागृती ❊ स्वच्छता अभियान ❊ महिला सुरक्षा ❊ पर्यावरण जनजागृती ❊ ग्रामोपयोगी श्रमदान ❊ शेतकरी कल्याण उपक्रम

उज्वल भविष्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना

### प्रेषक

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती.

"खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे"



अ
भि
यान







ग्रामस्थांसोबत चर्चा, पथनाट्य, आरोग्य तपासणी शिबिर तसेच विविध विषयांवर शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा राबवण्यात आल्या. दिनांक ०६ जानेवारी ला शिबिरार्थींचे आगमन, नोंदणी, गटविभागिनी व ग्रामस्थांसोबत चर्चा कार्यक्रम घेण्यात आले. दिनांक ०७ जानेवारी रोजी उद्घाटन समारंभ व वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. दिनांक ०८ जानेवारी रोजी गावांमधून पर्यावरण जनजागृती फेरी काढण्यात आली. तसेच ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दिनांक ०९ जानेवारी रोजी भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दिनांक १० जानेवारी रोजी प्राध्यापक श्री. मदन जाधव (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग) यांचे शेतकऱ्यांसाठी जनावरांमधील लंपी आजाराबद्दल मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच दुपारच्या सुमारास मूल्यशिक्षण व्यक्तिमत्व विकास या विषयावर प्राध्यापिका सौ.सीमा दिगाडे यांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. दिनांक ११ जानेवारी रोजी प्रगतिशील शेतकरी श्री. महादेवराव किरकटे यांच्यासोबत कृषक चर्चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला व गावातील चौकांमध्ये पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. दिनांक १२ जानेवारी ला शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांचे व स्पर्धांचे  आयोजन करण्यात आले व ०७ दिवशीय विशेष शिबिराची समारोपीय कार्यक्रमाने सांगता करण्यात आली

राष्ट्रीय मतदार दिवस - २५ जानेवारी २०२३



पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयात राष्ट्रिय मतदार दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री डॉ. वैभव लाजुरकर यांनी मतदान करण्याविषयी नराश्यता न बाळगता मतदान प्रक्रियेमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी विद्यार्थी तसेच प्राध्यापक व कर्मचारी यांनी मतदान हक्क बजावण्या संदर्भात प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी स्वीप प्रमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, सर्व स्वयंसेवक यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

## प्रजासत्ताक दिवस - २६ जानेवारी २०२३





पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे भारतीय प्रजासत्ताक दिवस साजरा. सदर कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रविनभाऊ पोटे पाटील यांनी ध्वजारोहण केले व सर्वांना प्रजासत्ताक दिवसाचे महत्व सांगितले. सदर कार्यक्रमास उपस्थित संस्थेचे सर्व सभासद महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व शिक्षकवृंद, महाविद्यालयीन कर्मचारी मोठया संखेने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रियसेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नितेश चौधरी व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.





पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्याक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर व इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहीद दिन – २३ मार्च २०२३





अमरावती : शहीददिन कार्यक्रमाला उपस्थित शिक्षक व विद्यार्थी.

**पोटे पाटील कृषी महाविद्यालयात शहीद दिन**

अमरावती : पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात या स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रतीमेला माल्यार्पण व आदरांजली अर्पण करून शहीद दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथे स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रतिमेला हरार्पण करून शहीद दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव लाजुरकर यांनी भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या जीवनावर प्रकाश टाकत कार्यक्रमाचे औचित्य समजुन सांगितले.

## महात्मा जोतीबा फुले जयंती -११ एप्रिल २०२३



दिनांक ११ एप्रिल रोजी महात्मा जोतीबा फुले यांची जयंती महाविद्यालयाद्वारे साजरी करण्यात आल. सदर कार्यक्रमाकरिता महाविद्यालायचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,शिक्षक शिकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम मिशन सक्सेस रीडीफाईंड-९-११ मे २०२३






### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता 'मिशन सक्सेस रिडिफाइन्ड'

तीन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन : कृषी महाविद्यालयांचे संयुक्त उपक्रम

अमरावती दि.९ : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या सहकार्याने व राष्ट्रीय सेवा योजना विभाग सौ. वसुधाताई देशमुख अन्नतंत्रज्ञान महाविद्याल पाळा, सौ. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय बोडणा, श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, श्री शिवाजी उद्यान विद्या महाविदयालय, श्री शिवाजी कृषी जैव तंत्रज्ञान महाविदपालव, व पी. आर पोटे कृषी महाविदयालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने रुबीकॉन स्किल डेव्हलपमेंट प्रा. लि. पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ' मिशन सक्सेस रेडिफाइन्ड चे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाच्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषक भवन येथे मंगळवारी उदघाटन पार पडले.

या उदघाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप हाडोळे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून सौ. वसुधाताई देशमुख अन्नतंत्रज्ञान महाविद्याल पाळा चे प्राचार्य डॉ. संयोगिता देशमुख, सौ. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय बोडणा चे प्राचार्य डॉ. संजय देशमुख, पुणे येथील कंपनीच्या प्रशिक्षक निखिल प्रधान, हरविंदर सिंह, पिंकी खंडेलवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

या तिन दिवसीय प्रशिक्षणा कार्यशाळेकरीता सुमारे शेकडो विद्यार्थ्यांनी नाव नोंदविले आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश म्हणजे कृषी व कृषी सलग्नीत अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भावी जीवनामध्ये नोकरी किंवा स्वतःचा व्यवसाय करण्याकरीता प्रत्यक्ष अडचणी येतात. त्यावर मात करून त्यांच्या जिवनाचा मार्ग सुकर करणे हा आहे. त्यामुळे आजच्या काळाची गरज म्हणून अभ्यासक्रमा व्यतिरिक्त सॉफ्ट स्किल ची नितांत आवश्यकता आहे. अशा सर्वच सॉफ्ट स्किल बाबत मार्गदर्शन या प्रशिक्षणात देण्यात येणार आहे. जसे ग्रुप डिस्कशन, पर्सनल इंटरव्ह्यूव, टेलीफोन, बॉडी लँग्वेग, पब्लीक स्पिकिंग, आईस ब्रेकिंग इत्यादी अनेक विषयावर मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दिपक पाढेकर यांनी केले. उपरोक्त महाविदयालयाचे रा. से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पंकज वानखडे, प्रा. दिनेश देशमुख, प्रा. नितेश चौधरी, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. डॉ. करण देशमुख यांचे विशेष सहकारी लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. दिनेश देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. उदय देशमुख यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या सहकार्याने व राष्ट्रीय सेवा योजना विभाग पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती, श्री. शिवाजी कृषी महाविद्यालय, श्री. शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, श्री. शिवाजी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, सौ. वसुधाताई देशमुख अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, सौ. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय, बोडणा यांच्या संयुक्त विद्यमाने 'रूबीकॉन स्किल डेव्हलपमेंट' प्रा. लि. पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली 'सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम मिशन सक्सेस रीडीफाईंड' चे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन  करण्यात आले.